आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com




'कुणी नेटवर्क देता का नेटवर्क?'

पान ३ वर



भारताची पहिली व्यावसायिक बास्केटबॉल लीग सुरू

पान ४ वर


वेर्णा, सोमवार, ९ जून २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 277 | Verna, | facebook.com/dainikherald | Monday 9 June 2025 | Pages 4 | ₹ 4


## निवडक

### ट्रम्प आणि पुतिण यांच्यात जुंपणार

**वॉशिंग्टन, दि. ८ :** टेस्ला कंपनीचे सीईओ आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यातील तणाव चांगलाच वाढला आहे. रशियातील खासदार दिमित्री नोविकोव्ह यांनी मस्क हे रशियात राजकीय आश्रय घेऊ शकतात असे सूचक विधान केले आहे.

ट्रम्प आणि मस्क यांच्या उघडपणे आरोप–प्रत्यारोप केले जात असल्याच्या पार्श्वभूमीवर स्टेट ड्यूमा कमिटी ऑन इंटरनॅशलम अफेअर्स (कम्युनिस्ट पार्टी ऑफ द रशियन फेडरेशन) चे पहिले उपाध्यक्ष असलेल्या नोविकोव्ह यांनी हे विधान केले आहे.

रशिया एडवर्ड स्नोडेनप्रमाणे एलॉन मस्क यांना राजकीय आश्रय देईल का? असा प्रश्न माध्यमांकडून विचारण्यात आला होता. मला वाटतं की मस्क यांचा गेम पूर्णपणे वेगळा असून त्यांना कोणत्याही राजकीय आश्रयाची आवश्यकता भासणार नाही, जरी त्यांना तशी गरज वाटली तर नक्कीच रशिया ते देईल, असे उत्तर नोविकोव्ह यांनी दिले.

------------------

### आसाममध्ये पुराचा तडाखा; २३ जणांचा मृत्यू

**दिसपूर, दि. ८ :** आसामच्या १२ जिल्ह्यांमध्ये पुराता तडाखा बसला आहे. याठिकाणचे सुमारे ३.३७ लाख नागरिक अजूनही पुराच्या विळख्यात असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी आज, रविवारी दिली. आसाम सरकारच्या धिकाऱ्यांकडून मिळालेल्या माहितीनुसार आतापर्यंत पुर आणि भूस्खलनामुळे एकूण २३ जणांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये ६ जण भूस्खलनात मरण पावले आहेत. राज्यातील श्रीभूम सर्वाधिक पूरप्रभावित भाग असून, १.९३ लाखांहून अधिक लोक तिथे पुराच्या विळख्यात आहेत. इतर प्रभावित जिल्ह्यांमध्ये हैलाकांडी येथील ७३७२४ तर कछार येथील ५६३९८ नागरिकांना पुराचा फटका बसला आहे. राज्यात एकूण ३३७३५८ नागरिकांना पुराचा फटका बसला आहे. तर ४१ सर्कल व ९९९ गावे प्रभावित झाली आहेत. राज्यातील ३६ हजारांहून अधिक नागरिकांनी १३३ मदत ावण्यांमध्ये आश्रय घेतला आहे. तर ६८ मदत वितरण केंद्रांतून गरजूंना मदत पोहचवली जात आहे. राज्यात पुरामुळे १२६५९ हेक्टर शेतजमीन पाण्याखाली गेली आहे.

# आरोग्यमंत्र्यांचा निर्णय मुख्यमंत्र्यांनी केला रद्द

## डॉ. रुद्रेश कुट्टीकर यांचे निलंबन ४८ तासांत मागे | जीएमसीतील डॉक्टरांचे केले कौतुक

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. ८ : जीएमसीचे मुख्य वैदयकीय अधिकारी डॉ. रुद्रेश कुट्टीकर यांचे आरोग्यमंत्र्यानी ऑन कॅमेरा केलेले जाहीर निलंबन मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी तातडीने हस्तक्षेप करीत रद्द केले आहे. याबाबत मुख्यमंत्र्यानी आपल्या 'एक्स' हँडल वर एक पोस्ट करून माहिती दिली आहे. मुख्यमंत्र्यानी या पोस्ट मध्ये म्हटले आहे की, मी गोवा मेडिकल कॉलेजमधील या प्रकरणाचा आढावा घेतला आहे आणि आरोग्यमंत्र्यांशी चर्चा केली आहे. मी गोव्यातील लोकांना खात्री देऊ इच्छितो की, डॉ. रुद्रेश कुट्टीकर यांना निलंबित केले जाणार नाही. राज्य सरकार आणि आमचे समर्पित वैद्यकीय पथक प्रत्येक नागरिकांसाठी आरोग्यसेवेचे सर्वोच्च मानक सुनिश्चित करण्यासाठी पूर्णपणे वचनबद्ध आहे. जीव वाचवणाऱ्या आमच्या डॉक्टरांच्या अथक प्रयत्नांचे आणि अमूल्य सेवेचे आम्ही कौतुक करतो.**




एका महिलेला इंजेक्शन देण्यास नकार दिल्याच्या कारणावरून शनिवारी जीएमसी मध्ये अचानक भेट देऊन आरोग्यमंत्री विश्वजित राणे यांनी मुख्य वैदयकीय अधिकारी डॉ रुद्रेश कुट्टीकर् यांना सर्व कर्मचारी आणि अधिकाऱ्यांसमोरच 'गेट आऊट' म्हणत त्यांचे निलंबन केले होते . मात्र आरोग्यमंत्र्यांच्या या आक्रमक निर्णयाविरोधात आणि डॉ कुट्टीकर् यांना सर्वांसमकक्ष अपमानीत केल्याचा निषेध करीत इंडियन मेडीकल असोसोएशनसह अन्य वैद्यकीय कर्मचारी संघटनांनी त्यांच्या जाहीर माफीची मागणी करीत तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला होता. विरोधी पक्षांनीही या संपूर्ण प्रकरणाला हवा देत आरोग्य मंत्र्यांसह मुख्यमंत्र्यांवर देखील जोरदार टीकेचा भडिमार करण्यास सुरुवात केली होती . या सगळ्याचा राज्याच्या आरोग्य सेवेवर गंभीर परिणाम होण्याची शक्यता गृहीत धरता मुख्यमंत्र्यांना या प्रकरणात हस्तक्षेप करण्यावाचून पर्याय राहीला नसल्यामुळे त्याना आरोग्यमंत्र्यांशी चर्चा करून डॉ कुट्टीकर् यांचे निलंबन रद्द केल्याचा निर्णय जाहीर करावा लागला आहे. इतकेच नाही तर जीव वाचवणाऱ्या आमच्या डॉक्टरांच्या अथक प्रयत्नांचे आणि अमूल्य सेवेचे आम्ही कौतुक करतो असे आपल्या 'एक्स' पोस्ट मध्ये म्हणत मुख्यमंत्र्यांनी डॉ. कुट्टीकर प्रकरणामुळे निर्माण झालेला डॉक्टरांचा रोष कमी करण्याचा प्रयत्न केला आहे.

दरम्यान शनिवारच्या जीएमसी मधील निलंबन नाट्याचा व्हिडीओ सर्वत्र व्हायरल झाल्यानंतर समाजमाध्यमात आरोग्यमंत्र्यांविरोधातत जोरदार प्रतिक्रीया उमटल्या. याची दखल घेत शनिवारी रात्रीच सोशलमिडियावर आरोग्यमंत्र्यानी आपली बाजू संविस्तर मांडली. एका ज्येष्ठ महिलेला योग्य वागणूक मिळाली नसल्यामुळे मी संतापलो. मी ज्या पद्धतीने सिनीअर डॉक्टरांशी संवाद साधला त्याबाबतची जबाबदारी मी घेतोव पुन्हा असा प्रकार होणार नाही अशी हमी देतो, असे मंत्री राणे यांनी आपल्या स्पष्टीकरणात म्हटले आहे. मात्र संबंधीत डॉक्टरची माफी मागण्यास त्यांनी या स्पष्टीकरणात नकार दिला आहे.

# मणिपूरमध्ये पुन्हा आंदोलन

▶ पाच जिल्ह्यांतील इंटरनेट सेवा बंद

**इम्फाल, दि. ८ :**

मणिपूरच्या राजधानी इम्फाळमध्ये शनिवारी (७ जून) काही भागांत झालेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने कडक उपाययोजना केल्या असून, संध्याकाळपासून राज्यातील पाच जिल्ह्यांतील इंटरनेट सेवा तात्पुरती स्थगित करण्यात आली आहे. तर चार जिल्ह्यांमध्ये सार्वजनिक जमावबंदी तर एक जिल्ह्यात संचारबंदी लागू करण्यात आली आहे.

मैतेई समाजाच्या एका स्थानिक संघटनेच्या नेत्याला कथितपणे अटक करण्यात आल्याची माहिती पसरल्यानंतर इम्फाळमधील क्वाकेइथेल आणि उरीपोक या भागांमध्ये जोरदार आंदोलन उफाळून आले. आंदोलकांनी टायर आणि फर्निचरची जाळपोळ केल्याचे वृत्त आहे. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी अतिरिक्त पोलीस आणि सुरक्षा दल तैनात करण्यात आले आहेत, अशी माहिती एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

मणिपूर पोलिसांच्या माहितीनुसार, इम्फाळ पश्चिम, इम्फाळ पूर्व, थौबल आणि काकचिंग या जिल्ह्यांमध्ये भारतीय नागरी सुरक्षा संहिता अंतर्गत कलम १६३ लागू करण्यात आले आहे. बिष्णूपूर जिल्ह्यात मात्र संचारबंदी लागू करण्यात आली असून, ती पुढील आदेशापर्यंत कायम राहणार आहे.

मणिपूर सरकारच्या अधिकृत निवेदनानुसार, ७ जून रोजी रात्री ११.४५ पासून पुढील पाच दिवसांसाठी इम्फाळ पश्चिम, इम्फाळ पूर्व, थौबल, बिष्णूपूर आणि काकचिंग या जिल्ह्यांतील इंटरनेट सेवा बंद ठेवण्यात येणार आहे. अशा प्रकारे आंदोलन आणि अफवा नियंत्रणात ठेवण्याचा प्रयत्न केला जात आहे.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व खासदार जयराम रमेश यांनी या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारवर टीका केली आहे. सोशल मीडियावर पोस्ट करत त्यांनी म्हटलं की, मणिपूरमधील अनेक जिल्ह्यांत गेल्या २४ तासांपासून हिंसाचार सुरु असून कायदा–सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. अशा स्थितीत पंतप्रधानांनी राज्याचा दौरा करावा, हीच जनतेची अपेक्षा आहे.

सीआयडीच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ७ जून रोजी कानन सिंह नावाच्या व्यक्तीला अटक करण्यात आली असून, राष्ट्रीय तपास संस्था त्यांना गुवाहाटीला घेऊन जाणार आहे. त्यांच्या विरोधात राज्याचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक मोइरंगथेम अमित यांच्या घरावर हल्ला, अपहरण व अन्य गंभीर आरोप आहेत. स्थानिक पत्रकारांनी देखील पुष्टी केली की कानन सिंह यांना अटक करून विमानतळावर नेण्यात आले. त्यांच्या अटकेनंतरच इम्फाळमध्ये आंदोलने सुरू झाली.

मणिपूरमध्ये गेल्या दोन वर्षांपासून सुरू असलेल्या जातीय संघर्षाची ही घटना एक नवी कडी ठरत आहे.

पान २ ▶

# बस्तोडा हल्ला प्रकरण : अद्याप आणखी अटक नाही

▶ महिला काँग्रेसचा सरकारला अल्टिमेटम

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. ८ :** बस्तोडा येथील गर्भवती महिलेसह दोन जणांवर करण्यात आलेल्या हल्ल्याप्रकरणी पोलिस तपास सुरू असतानाही, अद्याप कोणतीही नवीन अटक झालेली नाही. म्हापसा पोलिस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातील या खळबळजनक घटनेमुळे राज्याच्या कायदा–सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या प्रकरणी एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, तपास सुरू असून, विविध पथके तयार करण्यात आली आहेत. संबंधित ठिकाणी छापेही टाकण्यात येत आहेत.ही घटना २ जून रोजी दुपारी घडली. अल्डोना येथील रहिवासी विवेक शिरोडकर आणि त्यांची गर्भवती पत्नी श्रुती शिरोडकर हे आपल्या बाळाच्या पहिल्या स्कॅनसाठी उत्सुकतेने जात असताना त्यांच्यावर रस्त्यातच हल्ला करण्यात आला. सुरुवातीला वादविवाद झाल्यानंतर परिस्थिती गंभीर झाली आणि दाम्पत्यावर मारहाण झाली. त्यामुळे या नवदांपत्याला गंभीर शारीरिक आणि मानसिक धक्का बसला.

पोलिसांनी ३ जून रोजी दिलेल्या माहितीनुसार, रंगनाथ शेट्ये (५५), विनोद शेटकर (४७) आणि कौशल तुळशीदास शेट्ये (३२) या तिघांना अटक करण्यात आली आहे. तिघेही बार्देश तालुक्यातील मोइरा येथील रहिवासी असून,हल्ल्यात वापरलेली दोन वाहने पोलिसांनी जप्त केली आहेत. मात्र मुख्य आरोपी अद्याप फरार आहे.

या प्रकरणात आता राजकीय प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. गोवा प्रदेश महिला काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ. प्रतीक्षा खलप यांनी घटनेतील सर्व आरोपींना त्वरित अटक करण्याची मागणी करत राज्य सरकारला १५ दिवसांचा अल्टिमेटम दिला आहे.

गोव्यात कायद्याचा धाक उरलेला नाही. हे राज्य बनाना रिपब्लिक' बनले आहे. गुन्हेगार खुलेआम फिरत आहेत. आजपर्यंत फक्त तीन आरोपी

पान २ ▶





HYUNDAI

Scan to visit https://cretaelectric.hyundai.co.in/

Battery pack options: 51.4 kWh and 42 kWh

my Hyundai app

3 YEAR Unlimited~ Kilometer Warranty

UPTO 7 YEARS Extended Warranty**

8 YEAR 1 60 000km Battery Warranty^

UPTO 5 YEARS Shield of Trust Service Packages~

Scan to chat with us or give a missed call at 9555295868

**For Information Contact:** Toll Free: 1800114645 **Porvorim:** Alcon Hyundai, Ph: 7030938989 **Margao:** Alcon Hyundai, Ph: 7030938989 **Verna:** Goa Hyundai, Ph: 6699999, 9822131489 **Tivim:** Goa Hyundai, Ph: 8390965558 **Ponda:** Goa Hyundai, Ph: 2313375, 9822588861

*Ex-showroom price for Executive trim (42 kWh battery pack). Terms & conditions apply. Features and specifications shown in pictures may not be part of standard fitment and the same may vary from variant to variant. To know more, visit https://cretaelectric.hyundai.co.in/. Hyundai Motor India Limited reserves the right to change specifications, colour and equipment at any time without prior notice. The black shades on glass is due to lighting effect. ^Battery warranty up to 8 years or 1 60 000 kms whichever occurs earlier. **Extended warranty upto 7 years or 1 40 000 Kms whichever is earlier from the date of purchase. Extended warranty is not applicable if vehicle covers more than 1 40 000 kms within 3 years basic warranty. ~For detailed terms & conditions of Extended warranty, Road Side Assistance & Shield of Trust/Shield of Trust Super, kindly visit Hyundai India website. https://www.hyundai.com or Hyundai showroom. #Basis SIAM data Jan-May 2025.

INNOCEAN–036/25